I O प्रत

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** बीड **P.S.(ठाणे):** गेवराई

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0323 **Year (वर्ष):** 2024

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/07/2024 00:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शुक्रवार **Date From (दिनांक पासून):** 26/07/2024
**Time Period (कालावधी):** पहर 6 **Date To ( दिनांक पर्यंत):** 26/07/2024
**Time From (वेळेपासून):** 17:27 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 17:27 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 27/07/2024 **Time (वेळ):** 00:24 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 006
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/07/2024 00:24 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 03 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** माऊली ऑटो गॅरेज ,गेवराई

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): दादासाहेब बप्पासाहेब गवारे

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1991

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | देवपिंपरी,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | देवपिंपरी,गेवराई,गेवराई,बीड,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9527938181

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | संदिप रोहीदास राठोड | | | 1. नाईक नगर, गेवराई,गेवराई,बीड, महाराष्ट्र,भारत |
| 2 | चंद्रकांत धर्मराज शेळके | | | 1. पंचाळेश्वर,गेवराई,गेवराई,बीड, महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
फिर्याद

गेवराई, जि.बीड

दिनांक 26/07/2024

मी दादासाहेब बप्पासाहेब गवारे, वय-33 वर्ष, व्यवसाय- शेती, रा.देवपिंपरी, ता.गेवराई, जि.बीड, मो.क्र. 9527938181.
समक्ष फिर्याद देतो की, मी दिनांक 26/07/2024 रोजी ता.गेवराई, जि.बीड येथे हजर येवुन पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील, लाप्रवि छत्रपती संभाजीनगर यांचे व दोन शासकिय पंचासमक्ष लेखी तक्रार दिली ती पुढील प्रमाणे,
मी वरील प्रमाणे असुन माझी लाचमागणीची तक्रार असले बाबत मी पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर यांना आज रोजी फोनव्दारे कळविले व माझ्या तक्रारीवर कार्यवाही करण्याकरीता मला पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील, ला.प्र.वि.छत्रपती संभाजीनगर यांचा फोन आला व मी त्यांन तुम्ही गेवराई जि. बीड येथे येऊन माझे तक्रारीवर कार्यवाही करावी असे सांगीतल्याने पोलीस उप अधीक्षक श्रीमती संगीता पाटील हया सापळा पथकासह गेवराई येथे आल्याने त्यांची भेट झाल्यानंतर मी समक्ष गेवराई जि.बीड येथे सुरक्षीत ठिकाणी हजर राहुन तक्रार देतो की, माझ्या व माझे वडील श्री.बाप्पासाहेब विश्वनाथ गवारे यांचे नावे देवपिंपरी शिवार,गट नं.47 येथे असलेल्या शेत जमीनी वर मला दोन रेशिम उद्योग सुरु करायचे असल्याने सदर उदयोग सुरु करण्यासाठी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रेशीम उद्योग सुरु करण्यासाठी शासनाचे अनुदान मिळणे करीता मी नियमाप्रमाणे फाईल तयार करुन फाईल दाखल करण्या करीता दिनांक 11/06/2024 रोजी तहसील कार्यालय गेवराई येथील रोजगार हमी योजना कार्यालयातील रेशीम उदयोग विभागाचे राठोड साहेब यांना भेटलो असता त्यांनी सदर फाईल मध्ये ग्रामपंचायत चा ठराव नसल्याने ठराव घेऊन ये तसेच सदर फाईल मंजुरी करीता तुला प्रती फाईल 10500/- रुपये दयावे लागतील व पैसे दिल्या शिवाय तुझी रेशीम उदयोगाची फाईल मी मंजुरी करीता पुटअप करणार नाही असे सांगीतले.
मला श्री.राठोड इंजीनीयर यांना लाच देण्याची इच्छा नाही व ते मागत असलेले पैसे हे लाच म्हणुन मागत असल्याची मला खात्री आहे. माझा श्री.राठोड इंजीनीयर यांचेशी कोणताही पैसे देणे घेणेचा व्यवहार नाही व वैर किंवा दुश्मनी नाही.
मला दिनांक 18/06/2024 रोजी ग्रामपंचाय देवपिंपरी येथील ठराव मिळाला परंतु पैशांच्या अडचणी मुळे व माझ्या कौटुंबीक अडचणी मुळे मी त्यावेळी राठोड साहेब यांना भेटण्यास गेलो नाही मी आज दिनांक 26/07/2024 रोजी राठोड साहेब इंजीनीयर यांची भेट घेणार आहे. त्यावेळी इंजीनीयर राठोड यांनी माझ्या कडे पैशांची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास त्यांचे विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी हि विनंती. अशी तक्रार दिली होती.
माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पोलीस उप अधीक्षक पाटील मॅडम यांनी प्रथम लाच मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेतला व आम्हाला योग्य त्या सुचना दिल्या.
त्यानंतर मी राठोड यांना फोन करुन भेटण्याची वेळ व ठिकाण निश्चीत केले असता राठोड यांनी मला सामान्य रुग्णालय, गेवराई जवळील माऊली गॅरेज येथे लगेचच बोलावले त्यानुसार सुरक्षीत ठिकाणाहुन माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन पंच क्र. 1 श्री.वाघ यांना सोबत घेवुन राठोड यांची भेट घेण्या करीता रवाना केले. मी व पंच क्र. 1 माझे खाजगी मोटार सायकलने गेवराई सामान्य रुग्नालय येथील माऊली गॅरेज येथे गेलो तेथे माझी व इंजीनीयर राठोड यांची भेट झाली व माझ्या रेशीम उदयोगाच्या फाईल संदर्भात चर्चा झाली सदर चर्चे दरम्यान राठोड इंजीनीयर

यांनी माझ्या कडील फाईल बघुन एक फाईल ओके असल्याचे सांगीतले व एका फाईलला दहा हजार लागतीन तुम्हाला त्यादिवशीच म्हणलो होतो ना मग, सगळ करायच म्हणल्यावर नई त मग पाच हजार असे सांगीतले त्यावर मी एका फाईलला दहा असे विचारले त्यावर राठोड हे एकविस होतेत त विसच द्या, आता तुमची मर्जि, चार लाख याय लागले तुम्हाला एका फाईलचे असे सांगुन तुम्ही एका फाईल करा नहीतर दोन्ही करा असे सांगीतले त्यावर मी राठोड यांना सर एक मार्गी लावा एकाच
आत्ता दिल्यावर दुसऱ्याच आनतो मग असे सांगीतले. त्यावर मी राठोड यांना मी लगेच दहा हजार रुपये घेऊन येतो असे सांगुन सापळा पथक थांबलेल्या सुरक्षीत ठिकाणी आलो. तेथे पोउपअधी पाटील मॅडम यांनी माझ्या कडील व्हॉईस रेकॉर्डर ताब्यात घेऊन त्यामध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण ऐकले असता सदर संभाषणामध्ये इंजीनीयर राठोड यांनी माझ्या रेशीम उदयोगाच्या फाईल दाखल करुन अणुदान मंजुरी करीता पुटअप करण्यासाठी प्रति फाईल 10500/- रुपये अशी दोन फाईलचे 21000 रुपये लाचेची मागणी करुन तडजोडी अंती एक फाईल दाखल करुन घेण्यासाठी 10000/- रुपये लाचेची मागणी केली असल्याचे स्पष्ट झाले तसेच सदर लाचेची रक्कम लगेचच घेऊन येण्याचे सांगीतले. तसेच सदर कारवाई दरम्यान राठोड इंजीनीयर यांचा मला फोन आला व त्यांनी सांगीतले की सदर लाचेची रक्कम व तुमची फाईल सामान्य रुग्नालय गेवराई चे गेट जवळील माऊली ऑटो गॅरेज येथील शेळके यांचेकडे देऊन टाका. मी बाहेरगावी जात आहे.
त्यानंतर पोउपधी पाटील मॅडम यांनी व सर्वानुमते लागलीच राठोड इंजीनीयर यांचे विरुध्द लाचेचा सापळा आजमावण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार सापळा कारवाईच्या वेळी राठोड इंजीनीयर यांनी मागणी केल्या प्रमाणे लाच म्हणुन देण्याकरिता आवश्यक असलेले 10,000/- रुपये बाबत पोउपअधी पाटील मॅडम यांनी विचारणा केली असता माझ्याकडे लाच म्हणुन देण्याकरिता आणलेल्या 10,000/- रुपये ज्यात 500/-रुपये दराच्या 20 भारतीय चलनी नोटा, असे पोउपअधी पाटील मॅडमयांचे समक्ष हजर केल्या. सदर नोटांचे नंबर एका कोऱ्या कागदावर लिहुन घेऊन त्यांनी पोलीस अंमलदार चांगदेव बागुल यांचे कडुन नोटांना अॅन्थ्रोसिन पावडर लावुन 500 दराच्या 20 नोटांचा एक बंडल तयार करुन बंडल माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिश्यात ठेवल्या. त्यानंतर मला व सापळा पथकाला सुचना देऊन व माझ्याकडे व्हॉईस रेकॉर्डर चालु करुन देवुन मला व पंच क्र. 1 वाघ यांचेसह राठोड इंजीनीयर यांनी सांगीतल्या प्रमाणे लाचेची रक्कम माऊली अॅटो गॅरेज येथील शेळके यांची भेटीकरिता सुरक्षीत ठिकाणावरुन माझे खाजगी मोटार सायकलने रवाना केले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 वाघ असे सोबत सामान्य रुग्णालय, गेवराई समोरील रोडवर थांबुन राठोड यांना फोन केला असता त्यांनी सदर लाचेची रक्कम माऊली गॅरेज येथील शेळके यांच्याकडे दया व त्यांचे फोनवरुन मला फोन करा असे सांगीतले. त्यानुसार मी माऊली गेरेज येथे गेलो व तेथे शेळके हे हजर नसल्याने मी व पंच असे सदर ठिकाणी थांबुन राहीलो थोडयाच वेळात शेळके हे सदर ठिकाणी आले त्यावेळी मी त्यांची भेट घेतली व त्यांना सांगीतले की इंजीनीयर राठोड साहेबांनी दहा हजार रुपये व फाईल तुमच्याकडे देण्याचे सांगीतले आहे. तसेच तुमच्या फोनवरुन त्यांना फोन करायला सांगीतला आहे. त्यावेळी शेळके हे म्हणाले की, ठिक आहे मी नेहमी साहेबांनी सांगीतलेले पैसे घेतो असे म्हणुन माझी रेशीम उद्योगाची फाईल हातात घेतली व त्यांचे मोबाईल वरुन रोठाडे यांना कॉल केला व किती पैसे घ्याचे असे विचारले त्यावर राठोड यांनी मला विचारले की किती फाईल करायच्या आहेत. त्यावर मी राठोड यांना सध्या एकच फाईल करायची आहे असे सांगीतले त्यावर राठोड हे म्हणाले की दहा हजारामध्ये एकच फाईल होईल वर्क ऑर्डर पर्यंत. त्यावर मी ठिक आहे असे म्हणुन राठोड यांना सांगीतले की तुम्ही सांगीतल्या प्रमाणे 10000/- रुपये व फाईल मी शेळके यांच्याकडे देतो त्यावर राठोड हे ठीक आहे असे म्हणाले त्यावेळी मी माझ्या पॅन्टच्या समोरील उजव्या बाजूच्या खिश्यातुन उजव्या हाताने 10,000/-रुपये काढून शेळके यांचे समोर धरले असता शेळके यांनी सदर लाचेची रक्कम त्यांचे डाव्या हाताने स्विकारुन मोजण्यास सुरवात केली. तेव्हा मी सापळा पुर्वनियोजीत इशारा सुचनेनुसार लगेचच मी सापळा पथकास दिसेल अशा डाव्या हाताने माझे डोके खाजवुन इशारा केला असता, सापळा पथकातील अधिकारी, कर्मचारी व पंच क्र. 2 असे घटनास्थळी हजर आले व शेळके यांना ताब्यात घेऊन पोलीस उप अधीक्षक पाटील यांनी संपुर्ण सापळा पथक व पंच यांचा परिचय दिला व त्यांचे कडुन लाचेची रक्कम हस्तगत करुन पंच क्र.2 यांचेकडे दिली. त्यानंतर सापळा पुर्व कारवाई दरम्यान लिहीलेल्या नोटांचे व शेळके यांचे कडुन ताब्यात घेतलेल्या नोटांचे क्रमांक पंच क्र.2 यांचे मदतीने तपासले असता सदर नोटांचे क्रमांक तंतोतंत जुळले.
त्यानंतर पोलीस उप अधीक्षक पाटील मॅडम यांनी शेळके यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता त्यांनी त्यांचे नाव चंद्रकांत धर्मराज शेळके, वय-25 वर्ष, व्यवसाय- माऊली गॅरेज चालक, रा.पंचाळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड असे सांगीतले तसेच सदर लाचेची रक्कम मी तांत्रीक अधिकारी राठोड साहेब यांचे सांगणे वरुन स्विकारीली असल्याबाबत सांगीतले तेंव्हा पोउपधी पाटील मॅडम यांचे सुचने वरुन शेळके यांनी राठोड यांना फोन करुन तुम्ही कुठे आहेत तुमचे पैसे दयायचे होते असे सांगीतले असता राठोड यांनी मी गावी चाललो आहे असे सांगुन फोन कट

केला.

त्यानंतर पोलीस उप अधीक्षक पाटील मॅडम यांनी तहसील कार्यालय, गेवराई येथे जाऊन राठोड इंजिनीयर यांचा शोध घेतला व त्यांची बाबत अधिक माहिती घेतली असता. राठोड इंजीनीयर यांचे नाव संदिप रोहीदास राठोड वय- 34 वर्ष, पद- तांत्रीक सहाय्यक ,(कंत्राटी) रेशिम उद्याग विभाग, नेम.गेवराई,जि.बीड रा.नाईक नगर, कोल्हे रोड, ता.गेवराई, जि.बीड असल्याची माहिती मिळाली.

तरी आज दिनांक 26/07/2024 तांत्रीक अधिकारी श्री.संदिप राठोड यांनी माझ्या महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रेशीम उद्योग सुरु करण्यासाठीची फाईल दाखल करुन घेऊन अणुदान मंजुरी करीता पुटअप करण्याकरीता प्रति फाईल 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन सध्या एक फाईल दाखल करा असे सांगुण सदर फाईलचे तडजोडी अंती 10,000/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम माऊली गॅरेज येथील चंद्रकांत शेळके यांचेकडे देण्याचे सांगीतले.

तसेच चंद्रकांत धर्मराज शेळके, वय-25 वर्ष, व्यवसाय- माऊली गॅरेज चालक, रा.पंचाळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड यांनी तांत्रीक सहाय्यक राठोड यांचे सांगणे वरुन माऊली ॲटो गॅरेज येथे सायंकाळी 17.27 वा माझ्याकडुन लाचेची रक्कम 10000/- रुपये पंचा समक्ष स्विकारली म्हणुन माझी त्यांचेविरुध्द कायदेशीर फिर्याद /तक्रार आहे.

माझी वरिल फिर्याद माझे सांगणे प्रमाणे माझे समक्ष मराठीत संगणकावर टंकलिखीत करण्यात आली असुन मी वाचुन पाहिली माझ्या सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
Deepak Dattatry Lanke
**Rank** (पद): I (Inspector) **No.**(क्र.): API
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

Bhawale

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
पो.स्टे. गेवराई.

**Signature of Officer in Charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): PRAVINKUMAR YUVF
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PI

# विशेष अहवाल

ACB ला. प्र. वि. Anti Corruption Bureau Maharashtra Our Work is Our Mission

कार्यालय पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

Phone & Fax No.0240/2344050 Email- dysp.acbcsn@mahapolice.gov.in

जा. क्र./पोउपअ/लाप्रवि/विशेष.अ./2024 2695 छत्रपती संभाजीनगर दिनांक- 29 /07/2024

प्रति,

**मा.महासंचालक,**
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
महाराष्ट्र राज्य.

**मार्फत** :- मा. पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर.

**विषय** :- पो.स्टे.गेवराई, बीड गु.र.नं. 323/2024 कलम- 7, 7 अ भ्र.प्र.अधिनियम- 1988 गुन्हयाचा विशेष अहवाल सादर केले बाबत.

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर युनिट यांनी ता.गेवराई, जि.बीड येथे दिनांक 27/07/2024 रोजी केलेल्या यशस्वी सापळा कारवाईचा विशेष अहवाल खालीलप्रमाणे सादर आहे.

| | | |
|---|---|---|
| 01 | गु.र.क्र. व कलम | 323/2024 कलम 7, 7 अ भ्र.प्र.अधि. 1988 |
| 02 | गुन्हा घडला दिनांक व वेळ | दिनांक 26/07/2024 रोजी 17.27 वा. चे सुमारास |
| 03 | गुन्हा दाखल दिनांक व वेळ | दिनांक 27/07/2024 रोजी 00.24 वा. |
| 04 | फिर्यादी नाव/पत्ता | श्री.दादासाहेब बप्पासाहेब गवारे, वय-३३ वर्ष, व्यवसाय- शेती, रा.देवपिंपरी, ता.गेवराई, जि.बीड |
| 05 | गुन्हयाचे ठिकाण | माऊली ॲटो गॅरेज, सामान्य रुग्णालय गेवराई समोर, गेवराई |
| 06 | तक्रारदार यांचा मुळ अर्जाचा दिनांक | 26/07/2024 |
| 07 | आरोपी लोकसेवकाचे नाव हुदद्दा/ कार्यरत विभाग/आरोपीचा राहता पत्ता | १) संदिप रोहीदास राठोड वय-३४ वर्ष, पद- तांत्रीक सहाय्यक ,(कंत्राटी) रेशिम उद्याग विभाग, नेम.गेवराई,जि.बीड रा.नाईक नगर, कोल्हे रोड, ता.गेवराई, जि.बीड.<br>२) चंद्रकांत धर्मराज शेळके, (खाजगी इसम) वय-२५ वर्ष, व्यवसाय- माऊली गॅरेज चालक, रा.पंचाळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड. |
| 08 | आरोपीच्या अटकेची दिनांक/वेळ | आरोपी क्र.1 :- फरार असुन मिळुन आले नाही.<br>आरोपी क्र.2 :- दि. 27/07/2024 .रोजी 00.51 वा. अटक |
| 09 | मागणी केलेली लाचेची रक्कम | 10,000/- रुपये. |
| 10 | लाचेची मागणी केल्याबाबत पुरावा आहे का ? | होय. |
| 11 | स्विकारलेली लाचेची रक्कम | 10,000/- रुपये. |
| 12 | लाचेची रक्कम स्विकारल्याबाबत पुरावा आहे का ? | होय. |
| 13 | घर झडतीत मिळुन आलेल्या मालमत्तेचा तपशिल | इलोसे राठोड यांचे घरझडती मध्ये 12,24,500/- रु. वस्तु मिळुन आल्या. |
| 14 | सापळा कारवाई दरम्यान हस्तगत मालमत्ता | ॲ.पावडर लागलेली लोचीची रक्कम 10,000/- |
| 15 | दाखल गुन्हयातील आरोपीचे मोबाईल जप्त केले आहे का ? | होय.<br>आरोपी चंद्रकांत शेळके यांचा आपो कंपनिचा 8000/- रु. किमतीच्या F 15 मोबाईल जप्त करण्यात आला आहे. |
| 16 | जप्त करण्यात आलेल्या मोबाईल मधुन काही पुरावे मिळाले आहेत काय ? | जप्त करण्यात आलेल्या मोबाईल मधुन कॉल लॉग, व्हॉट्अप चाटींग, व्हॉट्अप कॉल लॉग, फोन पे चे स्क्रिनशॉट घेऊन |

29/07/24

| | | |
|---|---|---|
| | | एकुण 20 पानावर सदर स्क्रिनशॉटची प्रिंटआऊट काढुन त्यावर पंचाच्या स्वाक्षरी घेऊन सदर कागदपत्रे तपासकामी ताब्यात घेण्यात आले आहेत. |
| 17 | तपासी अधिकारी | श्रीमती संगीता पाटील ,पोलीस उप अधिक्षक ,ला.प्र.वि. छत्रपती संभाजीनगर |
| 18 | तपास पुर्ण होण्याची अपेक्षित तारीख | 30/08/2024 |

19. गुन्हयाची थोडक्यात हकीकत :-

**सविनय सादर** की, दिनांक 26/07/2024 रोजी मुळ तक्रारदार श्रीदादासाहेब बप्पासाहेब गवारे, वय-३३ वर्ष, व्यवसाय-शेती, रा.देवपिंपरी, ता.गेवराई, जि.बीड यांनी गेवराई, जि.बीड येथे समक्ष हजर येऊन दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने प्रथम लाचेच्या मागणीची पडताळणी करण्याचा निर्णय घेऊन दोन शासकीय पंच उपलब्ध करुन दिनांक 26/07/2024 रोजी मॅऊली ॲटो गॅरजे, सामान्य रुग्णालय, गेवराई जवळ लाचेच्या मागणीची पडताळणी केली असता पडताळणीमध्ये इलोसे संदिप रोहीदास राठोड पद- तांत्रीक सहाय्यक ,(कंत्राटी) रेशिम उद्याग विभाग, नेम.गेवराई,जि.बीड रा.नाईक नगर, कोल्हे रोड, ता.गेवराई, जि.बीड यांनी तक्रारदार व त्यांचे वडीलाचे नावे रेशीम उदयोग सुरु करण्या करीता महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत रेशीम उद्योग सुरु करण्यासाठीची फाईल दाखल करुन घेऊन अणुदान मंजुरी करीता पुटअप करण्याकरीता प्रति फाईल १०,०००/- रुपये लाचेची मागणी करुन सध्या एक फाईल दाखल करण्याचे ठरवुन तडजोडी अंती १०,०००/-रुपये लाचेची मागणी करुन सदर लाचेची रक्कम लगेचच घेऊन येण्याचे सांगीतले व त्यानंतर तक्रारदार यांना फोन करुन लाचेची रक्कम व तक्रारदार यांचे कामाची फाईल माऊली गॅरेज येथील चंद्रकांत शेळके यांचेकडे देण्याचे सांगीतले.

लाचमागणी पडताळणी मध्ये आलोसे संदिप राठोड, तात्रिक सहाय्यक यांनी 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाल्याने तात्काळ सापळा कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात येऊन सापळा आयोजीत करण्यात आला असता तक्रारदार यांना पंच क्र. 1 यांचेसह व्हाईस रेकॉर्डर लावुन लाचेच्या नोटांना ॲन्थ्रॉसीन पावडर लावुन इलोसे संदिप राठोड यांनी सांगीतल्या प्रमाणे लाचेची रक्कम व तक्रारदार यांचे कामाची फाईल माऊली ॲटो गॅरेज येथील शेळके यांचे कडे देण्याकरीता पाठविण्यात आले असता सदर ठिकाणी तक्रारदार यांची पंचा समक्ष माऊली ॲटो गॅरेजचे चालक चंद्रकांत शेळके यांचेशी भेट झाली व सदर वेळी आरोपी चंद्रकांत शेळके यांनी त्यांचे फोन वरुन राठोड यांना फोन करुन तक्रारदार यांचे कडुन किती पैसे घ्यायचे आहे याबाबत खात्री करुन इलोसे संदिप राठोड यांचे सांगणे वरुन तक्रारदार यांचे कडुन लाचेची रक्कम 10,000/- रुपये पंचासमक्ष स्विकारली. त्यानंतर सापळा पथकाने त्यांना ताब्यात घेतल्यावर आमच्या सुचने प्रमाणे आरोपी चंद्रकांत शेळके यांनी राठोड यांना फोन करुन तुम्ही कोठे आहेत तुमचे पैसे दयायचे होते असे सांगीतले असता इलोसे राठोड यांनी मी बाहेर गावी चाललो आहे असे सांगुन फोन कट केला.

त्यानंतर आरोपी चंद्रकांत धर्मराज शेळके, वय-२५ वर्ष, व्यवसाय- माऊली गॅरेज चालक, रा.पंचाळेश्वर, ता.गेवराई, जि.बीड यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले व तक्रारदार यांनी दिलेल्या फिर्यादी वरुन इलोसे संदिप रोहीदास राठोड व आरोपी चंद्रकांत धर्मराज शेळके यांचे विरुध्द पो.स्टे.गेवरई, जि.बीड येथे दिनांक 27/07/2024 रोजी नमुद प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**सदर गुन्हयामध्ये आरोपी चंद्रकांत शेळके यांना दिनांक 27/07/2024 रोजी 00.51 वा.अटक करण्यात आलेली** आहे.

**सदर सापळा कारवाई नंतर इलोसे संदिप राठोड यांचे राहते घराची घरझडती घेण्यात आलेली आहे. तसेच आरोपी** चंद्रकांत शेळके यांना मुदतीत पिसीआर यादीसह मा.विशेष न्यायालय, बीड यांचे न्यायालयात हजर केले असता मा.न्यायालयाने आलोसे यांना दिनांक 29/07/2024 रोजी पावेतो पोलीस कस्टडी रिमांड मंजुर केला आहे. इलोसे संदिप राठोड यांचा शेध घेतला असता ते मिळुन आले नाही. सदर गुन्हयाचा तपास पोउपअधि संगीता पाटील, पोलीस उप अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग छत्रपती संभाजीनगर करील आहेत.

सविनय सादर

(संगीता पाटील)
तपास अधिकारी
पोलीस उप अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,
छत्रपती संभाजीनगर.